**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.3 No.10** **Nov – Dec 2022**

# भारतीय 'स्त्री' उन्नती विकास परिवर्तनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**प्रा.गांगुर्डे रामदास भिमा.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख (एम.ए,बि.एड,सेट,पेट,पी.एच.डीappr)
सुपे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुपे, ता.बारामती,जिल्हा पुणे.
***Corresponding Author*- प्रा.गांगुर्डे रामदास भिमा.**
इमेल abhiramdip@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7519278**

**प्रस्तावना:**

भारतीय समाज हा एक कृषी प्रधान आणि पुरुषप्रधान मानसिकतेचा देश व समाज आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक असणाऱ्या लोकसंख्येत महिला आणि वंचित बहुजन मागासलेल्या समाज वर्ग लोक संख्या मोठ्या प्रमाणात आहे. येथील जुनाट पारंपारिक, मनुवादी,सनातनी व्यवस्थेमुळे आणि चालीरीती प्रथा यांच्या नावाखाली सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व आणि पुरुष श्रेष्ठत्व या संकुचित विचार दृष्टिकोन आणि येथील मुठभर समाज घटकातील जुनाट, संकुचित विचाराच्या काही समाज वर्ग,गट लोकांनी कुटुंब, सामाजिक, राजकीय,आर्थिक, कौटुंबिक,सार्वजनिक मानसन्मान अशा सर्व क्षेत्रापासून भारतातील बहुतांशी महिलांना त्यांच्या अधिकार, स्वातंत्र्य ,सामाजिक कौटुंबिक अधिकार स्वातंत्र्य सन्मानापासून वंचित ठेवलेले आहे स्त्री म्हणजे मूल आणि चूल अशा मर्यादित चौकटीत बांधून ठेवले. महिलांच्या शारीरिक, आर्थिक ,सामाजिक, राजकीय अधिकाराची शोषण येथील पुरुषप्रधान संस्कृतीने स्वार्थापोटी मोठ्या प्रमाणात केले आहे. स्वतंत्र पूर्व काळापासून ते आधुनिक काळात भारतातील महिला /स्त्री उन्नती विकास सुधारणा आणि सुरक्षिततेसाठी अनेक भारतीय समाज सुधारक, महापुरुषांनी अर्थात राजाराम मोहन राय,महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती रानडे,गोखले,ठक्कर बाप्पा, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अशा अनेक समाज सुधारकांनी स्त्री व्यवस्थेच्या व तीच्या अनिष्ट चालीरीतीच्या विरुद्ध क्रांती चळवळी केल्या मात्र त्यामधून ठोस असे परिणाम व उपाय योजना भारतीय पुरुष समाज घटकांनी निर्माण होऊ दिल्या नाही. उलट अडथळे निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आधुनिक काळातील, मानवतेचा पुरस्कार करणारे भारतीय अखिल स्त्री उन्नती परिवर्तन सुधारणा शास्त्रीय व बुद्धीवादी आणि वास्तव दूरदृष्टी अभ्यासू दृष्टिकोनातून महामानव ज्यांनी बुद्ध धम्माच्या तथागताच्या उपदेशाचा स्त्रियांच्या उन्नती विकासाच्या स्थान,मानसन्मान,आदर्श उपदेश, जीवनपद्धती, मानव आणि भारतीय स्त्रि जीवनाला क्रांती प्रेरणा अशा बौद्ध संस्कृतीच्या आचारनाचा उपदेश देणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी भारती महिलांच्या सर्वांगीण प्रगती विषयी त्यांच्या न्याय हक्क आणि स्त्री मुक्ती या दृष्टीकोनातून भारताच्या प्रसार माध्यमे, संसद ,सार्वजनिक सामाजिक स्थानी बोलताना ठासून बोलत असे .स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून मी एखाद्या समाजाची प्रगती बरोबर त्या राष्ट्राची प्रगती मोजत असतो. भारतातील महिला गुलामगिरी, दारिद्र्य विरुद्ध सामाजिक क्रांती व त्यांच्या न्याय हक्क स्वातंत्र्य मान सन्मान मिळवून देण्या साठी हिंदू कोड बिल आणून ते भारतीय संसदेमध्ये मांडले त्या विरोधात येथील व्यवस्था गेल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या मान सन्मान अधिकार स्वातंत्र्याला विरोध केलेल्या संसदेचा पहिलाच कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील आम महिला उन्नती, विकास, परिवर्तन, सुधारणातील महत्त्वपूर्ण योगदान " न भूतो न भविष्यती"असा योगदानाचा इतिहास भारतातील कोणतीही महिला-पुरुष, समाज नाकारू शकत नाही.

**उद्दिष्टे:**

१) भारतीय स्त्री दारिद्र्य, अवनीती, सामाजिक, राजकीय जीवनातील दुय्यम स्थाननचा अभ्यास करणे.

२) भारतीय स्त्री उन्नती विकास परिवर्तन बदलात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वास्तव, सत्य कृती युक्त योगदान अभ्यासणे.

३) भारतीय महिलाना पुरुषाबरोबरचे स्वातंत्र्य हक्क,मान सन्मान सार्वजनिक स्थान मिळवून देण्यात साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानिक, कायदात्मक दिलेला लढा,संघर्ष भूमिकांचा अभ्यास करणे.

**गृहीतके:**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय महिलांना/स्त्रीला संविधानिक व कायदात्मक अधिकार प्राप्त करून देताच भारतीय समाजातील महिलांचे स्थान,हक्क,स्वातंत्र्य,मान सन्मान मोठ्या प्रमाणात जागृती झाली.

२) भारतीय समाज/लोकांमध्ये आधुनिक काळात महिलांची/मुलींची शिक्षण,आरोग्य,सामाजिक,राजकीय, आर्थिक,औद्योगिक, कौटुंबिक,राष्ट्रीय सर्वच क्षेत्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महिला संघर्ष उदय उन्नती विकास संघर्ष लढायला यश प्राप्त होऊन महिलांवरील होणारी अन्याय अत्याचार विरोधात जाचक कायदे त्याचबरोबर महिला सबलीकरण सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित झाले आहे

**अभ्यास पद्धती:**

सदर विषयाचा अभ्यास करण्यास कामे **सर्वेक्षण** संशोधन अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातीय समाज व्यवस्थेतील स्त्री संस्कृती इतिहास:**

भारतीय सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेतील स्त्रियांचा इतिहास अभ्यासता स्त्रियांना कायमच दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. स्त्रियांना दासी, गुलाम, चूल आणि मूल अशा प्रकारची हीन वागणूक दिल्याचे आढळते. विशिष्ट स्त्रियांना धार्मिक कार्यक्रम,सांस्कृतिक कार्यक्रम, या ठिकाणी संकुचित भावनेतून आदराचे स्थान देण्यात आल्याचे आढळते. परंतु बहुतांशी भारतीय समाज व्यवस्थेतील महिलांना विशेष मर्यादेच्या पलीकडे जाऊ दिले नाही. हा भारतीय व्यवस्थेतील स्त्रियांचा वास्तव इतिहास आपल्या सर्वांना माहीत आहे. भारतीय महिलांची अवस्था केविलवाणी आणि दैनिय होती. शिक्षणापासून मुळातच त्यांना वंचित ठेवले जात होते.अशा प्रकारची अवस्था होती. लहानपणीच मुला, मुलींची लग्न लावून देण्याची कुप्रथा, देवी देवांना लहान मुली वाहने ,सोडून देणे. देवाला मुरळी म्हणून सोडणे. स्त्रियांना पुरुषाबरोबरचे शिक्षण न देणे सार्वजनिक ठिकाणी बसून देणे वास्तव्य न करून देणे नोकरी न करून देणे. पुनर्विवाह न करणे. नवस उपास तपास महिलांनीच करणे बंधनकारक केले होते. महिलांच्या नैसर्गिक विधी काळी तिचा द्वेष,मत्सर,कौटुंबिक व सामाजिक ठिकाणी करणे. असा एकूणच भारतीय महिला /स्त्रियांचा सामाजिक इतिहास अभ्यासता एक भयावक आणि आधुनिक काळाला पटणार नाही. मानवतावाद उदारमतवाद, लोकशाही, विज्ञान शास्त्रीय दृष्टिकोनाला मुळीच मान्य नसणाऱ्या दृष्ट व वाईट प्रथांनी महिलांचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आढळतो तो वास्तव असल्याची ही पुरावे ऐतिहासिक अभ्यासात आहेत.

भारताच्या या महिला सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेला येथील समाज,राज्यकर्ते हीच जबाबदार असल्याचे निष्पन्न होते. अशा व्यवस्थित च्या विरुद्ध आणि महिला उन्नती विकास मुक्तीच्या उदार दृष्टिकोन विचार भावनेतून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिला क्रांतीची ज्योत पेटवून क्रांतिकारक असे बदल करण्याची आणि भारतीय स्त्री/ महिलांना त्यांच्या गुलामगिरी, दारिद्र्य ,दासी चुल नि मुल यापासून तसेच सामाजिक बंधने झुगारून त्यांचा मान सन्मान आदर हक्क स्वतंत्र्यासाठी नव्याने आंदोलने,चळवळी, क्रांतीस एक भक्कम असा आधार निर्माण करून प्रभावी भूमिका, योगदान दिले. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महिला उन्नती, विकास आणि प्रगती परिवर्तन बदलाविषयीचा दृष्टिकोन हा मानवतावादी,आधुनिक ,विज्ञानवादी तत्त्वनिष्ठ आणि वास्तव असाच होता.

भारतीय स्त्री मुक्ती उन्नती विकास सुधारणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तत्त्वनिष्ठ, दूरदृष्टी दृष्टिकोन स्त्री मुक्ती लढ्याचा भक्कम आधार बनला.

**१.भारतीय समाज व्यवस्था, जाती व्यवस्था,आणि स्री व्यवस्था दृष्टिकोनातून:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावादी उदारमतवादी समतावादी दृष्टिकोनातून भारतीय महिलांच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमीच सार्वजनिक, संसद ,संसदेत आणि लेखनातून,भाषणातून स्त्रियांची प्रगती त्या प्रमाणात होते. त्याच प्रमाणात एखाद्या समाजाची प्रगती मोजता येते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1942 रोजी नागपूर येथील ऑल इंडिया डिस्प्रेड क्लासेस वुमन्स कॉन्फर्म्स वेळी अखिल भारतीय महिलांना उद्देशून महिलांच्या सर्वांगीण प्रगती, विकास दृष्टिकोनाचा सहजतेने ओळख करून दिली. भारतीय पुरुष प्रधान आणि सामाजिक पारंपारिक अंदाज, अंधश्रद्धा, रूढी ,परंपरांनी जखडलेल्या या भारतीय महिलांना स्त्रीला देवता म्हणून तिची पूजा करायची तर दुसरीकडे तिला वस्तू म्हणून दुय्यम स्थान दासी लेखायचे वर वरची सहानुभूती महिलांच्या संदर्भात व्यक्त करून मात्र स्री एक माणूस आहे. तिची स्री म्हणून होणारी पिळवणूक नष्ट केली पाहिजे.स्त्रीला स्वतंत्रपणे जगता आले पाहिजे. तिचे हक्क शोषण, अन्याय, अस्पृश्यता आणि वर्णव्यवस्था या सर्व गोष्टीचा अंत होणे. आवश्यक आहे. भारतीय स्त्रियांना पुरुषा बरोबरीने समान वागणूक,समान हक्क समतेचा अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहाल करण्यासाठी महिलांचे नीती धैर्य, आत्मविश्वास, उत्साह वाढवण्यासाठी बळ दिले आहेत. हे आजच्या भारतीय महिलांनी विसरता कामा नये.

**२. भारतीय स्त्री मुक्तीचा मूळ आधार बुद्ध धम्म, वैधानिक,मानवतावादी दृष्टिकोन:**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे स्री मुक्तीचे स्री परिवर्तन सुधारणा वादाची खंदे समर्थक होते त्यांनी तथागत गौतम बुद्धाच्या धम्मा मधील स्री मुक्तीचा मूल्य आधार आणि विज्ञानवादी वास्तव मानवतावादी दृष्टिकोनातून भारतीय समाजातील अखंड बंधनामध्ये अडकलेली भारतीय महिला स्री या चौकटी मधून बाहेर मुक्तपणे करण्यासाठी महिलांना त्यांच्या उन्नती आणि सर्वांगीण विकासासाठी सर्वात प्रथम त्यांच्यातील अंधश्रद्धा अविश्वास, पारंपारिक दृष्ट चालीरीती, रूढी, परंपरेतून बाहेर काढण्यासाठी शिक्षण या साधनाचा उपयोग करून सर्व महिलांना पुरुषाबरोबरच शिक्षण आणि त्या शिक्षणातून भारतीय स्त्री साक्षरता, ज्ञानार्जन असा मूलमंत्र दिला. संपूर्ण स्री मुक्ती संघटन निर्माण करण्याचा अभूतपूर्व दृष्टिकोन आज यशस्वी झाल्याचा पुरावा म्हणजे आजची मुक्त,स्वतंत्र मान-सन्मान प्राप्तीयुक्त बदललेली सुधारलेली स्री / महिला होय.

**३. भारती महिला न्याय, हक्क, स्वतंत्र्य, संघर्ष लढ्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संविधानिक व कायदेत्मक दृष्टिकोन प्रत्यक्ष कृती मार्ग:**

भारतातील आम स्त्री यांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क मिळावीत वागणूक मिळावी जोपर्यंत स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होत नाही तोपर्यंत त्यांना कुटुंबात समाजात मानसन्मान प्रतिष्ठा मिळणार नाही त्याचबरोबर महिलांना शिक्षण शिक्षणाचाअधिकार प्राप्त झाल्याशिवाय महिलांची उन्नती विकास होणार नाही म्हणून येथील जातीव्यवस्था आणि स्त्रियांचे दुय्यम स्थान यातील अंतर संबंध प्रभावीपणे कायदा आत्मक आणि संविधानात्मक दृष्टिकोन आणि मांडला आहे. महिलांना त्यांच्यावर होणारी अन्याय अत्याचार छेळ या विरोधात आत्मनिर्भर आणि संघर्षआत्मक भूमिका घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याचा आधार उभा केला स्री मुक्तीच्या संदर्भात आदर्श संहिताचा जाहीरनामा मांडत राहिले. स्री- पुरुषांच्या भेदाची दरी नसावी यातील अंतर कमी करण्याची भूमिका प्रभावीपणे कायद्याद्वारे मांडली. येथील जाती व्यवस्थेतील जटिल रूढी परंपरातील स्री गुलामी दारिद्र्य आणि पुरुषप्रधान संस्कृतीतून समाज व्यवस्थेच्या विषमताचा कमी करून गुलामगिरीचे अंत अशा मानवतावादी दृष्टिकोन कायदात्मक दृष्टिकोन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्भीड आणि स्वच्छ भूमिकेतून मांडला. त्याशिवाय त्याला प्रत्यक्ष वाचा फोडली. हे आपल्या सर्वांना माहीत आहे.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील केवळ दलित महिलांना नवे तर भारतातील आम समाजातील महिलांना स्वतःचा मान सन्मान आणि स्वाभिमान माणुसकी प्राप्त करून दिली. त्यासाठी हिंदू कोड बिल भारतीय संसदेत कायदामंत्री म्हणून मांडले त्यामध्ये कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असते.म्हणून भारतीय स्री ही प्रगत असावी अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 11 एप्रिल 1946 रोजी संविधान सभेमध्ये

घेतली. 26 सप्टेंबर 1951 पर्यंत त्यावर विचार मंथन झाली मात्र हिंदू कोड बिल भारतातील संसदेमध्ये जे आम्ही उदार दृष्टिकोन आणि महिला सन्मानाची सार्वत्रिक ठिकाणी मोठमोठी भाषण आश्वासन देणारी आमचे राजकीय नेत्यांनी हिंदू कोड बिलाला नकार दिला.त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पहिल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला हेच हिंदू कोड बिल पुढे स्त्रियांसाठी एक सुरक्षा कवच तयार झाले. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या संविधानिक आणि कायदात्मक दृष्टिकोन आणि भारतीय महिलांच्या संघर्षाला अन्यायाला गुलामीला दारिद्र्याला वाचा फोडून एक महान क्रांतीचा संदेश देऊन भारतातील -उन्नती विकासासाठी सर्व प्रयत्न करून भारतीय महिला सुरक्षितेसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण अशी योगदान दिले. हे भारतातील सर्व जाती धर्मातील महिलांनी लक्षात ठेवले पाहिजे. केवळ आपली नोकरी ,आपला पती आपले मुले- बाळे किंवा कुटुंब नव्हे तर ज्यांनी आपल्याला स्त्री म्हणून सर्व अधिकार मान सन्मान प्राप्त करून दिला त्या महामानवाचा ऋण आपण ठेवले पाहिजे. हे लक्षात घेण्याजोगे आहे. स्त्री मुक्तीसाठी स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी त्यांच्या सार्वजनिक सामाजिक प्रतिष्ठेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानिक आणि कायदात्मक कृतीयुक्त संघर्ष आणि त्या संघर्षाचा इतिहास आजही जिवंत आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय महिलां प्रबोधन:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना स्त्री सक्षम,सबलीकरणात देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होतील.तसेच विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा लाभ होईल. याची कोणत्याही प्रकारची चिंता नव्हती. तर सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकाराची संरक्षण करायचे होते .देशाच्या विकासासाठी देशाच्या सर्व वर्गातील लोकांना त्याच बरोबर स्त्रियांना समानतेचा अधिकार प्राप्त करून दिला.त्यासाठी वारंवार सभा,लिखाण ,प्रसार माध्यमे ,संसदेत लढा देऊन सन्माननीय न्याय प्राप्त करून दिला.

नागपूर येथे १९४२ स अखिल भारतीय दलित महिला परिषदेस उपस्थित 25 हजाराहून अधिक महिला स्त्रियांना संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या प्रगतीवर शिक्षणावर भर दिला महिलांना स्थावर व जंगम इस्टे,ट वारसा हक्क आणि सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर आवाज उठवला. महिला परिषदेत आव्हान देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजात संदेश दिला.भारतीय समाज दारिद्र्य अवस्थेत राहण्याची कारण म्हणजे समाजातील स्त्रियांचा गौण दर्जा होय. मनुस्मृतीने शुद्रा बरोबर भारतीय स्त्रियांच अवमान केला असे ठासून सांगितले. भारतीय समाजातील पालेमुळे इतकी खोल गेलेली आहे. की येथील लोक कायद्याला सुद्धा जुमानत नाही. आपल्या मुली बायका एकूण स्त्रियांचे शत्रू त्याचबरोबर समाजाचे शत्रू बनलेली बघितल्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलांच्या आणि मुलींच्या शिक्षणासाठी आग्रह धरला. आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल यासाठी स्त्री शिक्षणावर सतत भर दिला जावा यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका घेतली.

भारतीय अस्पृश्य महिला परिषद नागपूर या ठिकाणी खान कामगार महिला प्रस्तुती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना व कष्टकरी स्त्रियांसाठी 21 दिवसाची किरकोळ रजा ,एका महिन्याची हक्काची रजा ,दुखापत झाल्यास नुकसान भरपाई, वीस वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतूद, पेन्शन यासारख्या महत्त्वपूर्ण महिलांसाठी संविधानिक आणि कायदात्मक लढा दिल्याचा इतिहास ताजाच आहे.

स्वतंत्र कायदामंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाच्या प्रस्ताव लोकसभेत मांडला अस्पृश्यतेचे स्त्री मुक्तीची उच्चाटन लग्नसंबंधातील स्त्री- पुरुष समानता सियांना काडीमोड घेण्याचा अधिकार वारसा हक्क लाभ सामाजिक न्यायाचा लढा यशस्वीपणे लढले आणि अखिल भारतीय महिला मध्ये एक नवे चैतन्य आत्मविश्वास निर्भिडता आणि विश्वास निर्माण केला. दलित अस्पृश्य समाजातील महिला उद्बोधन भाषण प्रभावी व यशस्वी ठरले महाड येथे दलित पुरुषांच्या बरोबर सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी दलित स्त्रिया ही प्रचंड संख्येने आलेल्या होत्या त्यावेळी भाषणात बाबासाहेबांनी तुम्हाला आपला मुलगा शिपाई व्हावा असे वाटते का? तो ऑफिसर व्हावा अशी आकांक्षा तुम्ही का करीत नाहीत? तुम्ही सर्वांनी जुन्या गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत गळयामध्ये डुप्लिकेट गळसऱ्या व दागिने घालण्यापेक्षा चांदीची दागिने

सोन्याचे दागिने घाला. मृत जनावराची मास खाऊ नका दारूबाज नवऱ्याला, भावाला अगर मुलांना स्थान देऊ नका .मुलींना शिक्षण द्या शिक्षण घ्या ज्ञानांजन करा अशा दारिद्र्यात पडलेल्या निरक्षर अशिक्षित स्त्रियांना योग्य ती दिशा देऊन स्त्री कुटुंब सुधारू शकते अनिष्ट प्रथा पद्धतीला झुगारून देण्याचे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना दिली होती. समाजातील अत्यंत दुर्लक्षित महिला लोकांच्या आत्मसन्मानाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विचार वेळोवेळी भाषणातून प्रबोधनातून देऊन भारती स्त्री उन्नती विकास सुधारणेला बळ दिली एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करून दिल.

**हिंदू कोड बिलरुपी भारतीय स्त्रीयांना/ महिलांना पुरुषाबरोबरचे हक्क अधिकार मान सन्मान सार्वजनिक स्थान प्राप्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेअभूतपूर्व योगदान:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सर्व समाज वर्ग गटातील महिलांच्या होणाऱ्या अन्याय अत्याचार समस्या, दारिद्र्य, गुलामी, मरण येतना पुरुष प्रधान संस्कृतीतून मुक्त करण्यासाठी घटनात्मक तरतूद आणि हिंदू कोड बिल मांडून महत्वपूर्ण महिला सबलीकरण सक्षमीकरण आणि स्वातंत्र्य स्त्रियांना सार्वत्रिक स्थान, समाज आणि अस्पृश्यता यातील अंतर संबंध नष्ट कले. एकूणच महिला मुक्ती उन्नती विकास प्रगती ही राष्ट्राची संपत्ती व विकास असल्याचे हिंदू कोड बिल द्वारे भारतीय समाजा समोर स्पष्टपणे मांडले. हिंदू विवाह कायदा हिंदू वारसा हक्क कायदा हिंदू अज्ञान पालकत्व कायदा हिंदू दत्तक व पोटगी कायदा महिला प्रस्तुती सहाय्य पेन्शन सार्वजनिक सुट्ट्या स्त्री शिक्षण, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन आत्मनिर्भर बनण्यासाठी सक्षम असा कायदा नेम हा हिंदू कोड बिल म्हणून आणले. स्त्रियांनाही त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्याचे बळ आत्मविश्वास हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राप्त करून दिला.समाज रचनेत बदल घडवून घटनात्मक तरतुदी करणारी हिंदू कोड बिल ठरले . स्त्री- पुरुषामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद किंवा दरी नसावी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने समानतेची वागणूक मिळावी श्री स्वातंत्र्याचा स्त्री समतेचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमीच करत आले आहे. ऑगस्ट 1946 रोजी संविधान सभेत हिंदू कोड बिल मांडण्यात आले. या हिंदू कोड बिलाला भारताच्या महत्त्वपूर्ण अशी घटना रूप प्राप्त झाली होती. संसदेत पार्लमेंट मध्ये यापूर्वी इतका महत्त्वाचा आणि प्रभावी कोणताही कायदा ठरला नाही. इतकी प्रभावी हिंदू कोड बिल ठरल. महिलांना संरक्षणाची ,आत्मबलाचे, ऊर्जा निर्माण करून देणारे हे हिंदू कोड बिल मोठ्या पराकष्टाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. त्यासंदर्भात कठोर आणि प्रभावी कायदा करण्यात यावा मात्र येथील समाजात आणि स्त्री विरुद्ध असणाऱ्या विशिष्ट मूठभर लोकांना ते रुसले नाही. त्याला विरोध करताच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र कायदामंत्री पदाचा राजीनामाही दिला. त्यानंतर 1955 56 मध्ये हिंदू कोड बिल मधील अनेक कायदे स्वीकारले लोकसभेत मंजूरही झाले. या कायद्यातील तरतुदीमुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात क्रांतिकारक बदल परिवर्तन घडणार सुरुवात झाली स्त्री पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली हिंदू कोड बिलावर संपूर्णपणे मंजुरीने मिळाला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजीनामा देताना समाजाच्या वर्गातील असमानता स्त्री पुरुष यांच्यातील असमानता त्याचप्रमाणे निगडित कायदे करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची शेणाच्या ढिगाऱ्यावर राजमहाल बांधण्यासारखी वाटते.

भारतीय नारी केवळ मुले जन्मास घालणारी उत्पादित मशीन नाही किंवा धुनी भांडी करणारी मशीन नाही. तर कुटुंबात उत्तम जन्माला येणाऱ्या अर्भकाच्या/ अपत्यावर संस्कार करून आदर्श समाजाचा पाया रचणारी माता आहे.जननी आहे. ती एक माणूस आहे. महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांच्या मते स्त्रियांनी ज्ञान क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या या योगदानामुळे अन्यायाविरुद्ध रडण्याऐवजी महिला लढू लागले आहे शिक्षण घेऊ लागले आहे देशातील स्त्रियांना मुक्ती परिवर्तन बदलाची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीतून प्राप्त होताना दिसत आहे म्हणून मला असे वाटते आपण सर्व भारतीय समाजातील मानव स्त्री-पुरुष आणि विचारशील मानव म्हणून आपण जोपर्यंत स्त्रियाकडे पाहणार नाही. तोपर्यंत स्त्रियांना त्यांच्या स्वतंत्र होण्यास अडथळे निर्माण होत जाणार स्त्रियांच्या स्वतंत्र्यातील,मुक्तीतील उन्नती, विकासातील अडसर आपण

न बनता त्यांच्या उन्नती विकासाला पोषक अशी समाज स्थिती कौटुंबिक स्थिती राजकीय स्थिती निर्माण करून या महान कार्यामध्ये सहभागी व्हावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारतातील महिलेला उन्नती विकास प्रगतीची द्वारी खुली करून तिचा सार्वजनिक मान सन्मान आदर निर्माण करण्यासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे.

**निष्कर्ष:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सर्व जाती धर्म समाज वर्गातील स्त्रियांना/ महिलांना विधायक संविधानात्मक कायदा आत्मक संघर्ष क्रांती लढ्यातून एक स्वतंत्र मुक्त चारित्र्यवान निर्भय निर्भीड सुशिक्षित सुजणे स्वावलंबी नारी निर्मिती करण्याचे सर्व मार्ग खुले केल्यामुळे त्यांच्या उन्नती विकास परिवर्तन बदलाला आज पोषक सामाजिक आर्थिक राजकीय स्थिती स्त्री सबलीकरण सक्षमतीकरण प्रेरणा व उत्तेजन प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) डॉक्टर आंबेडकर यांचे स्त्री विषयक लेखन महेंद्र गायकवाड संघर्ष प्रकाशन नागपूर २०१८.

२) भारतीय इतिहासातील स्त्री आणि कर्तुत्व सुषमा देशपांडे विद्या बुक्स प्रकाशन औरंगाबाद.

३) ग्रामीण मातंग श्री रामचंद्र भिसे डायमंड पब्लिकेशन पुणे.२०१६.

४) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर और उनकी समतावादी क्रांती मानव अधिकारो के परीप्रेक्षय २०१९

५) डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान सामाजिक न्याय अधिकारी ता मंत्रालय भारत सरकार नई दिल्ली.

६) भारत में नारी शिक्षा प्रभात प्रकाशन नई दिल्ली अग्रवाल जे.सी.

७) डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची पत्रकारिता प्रबोधन पोळ गंगाधर पानतावने.

८) दलित चळवळीच्या दिशा नारायण कांबळे.

९) दैनिक लोकमत,सकाळ,लोकसत्ता, सम्राट वृत्तपत्र प्रकाशित लेख. इको

१०) रेडिओ, दूरदर्शन माध्यमांशी विविध मान्यवरांच्या मुलाखती.